नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १३/०६/२०२६ (शनिवार )

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत नव्याने स्थापन झालेले मोहपा पोलीस स्टेशन आजपासून कार्यान्वित

गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अधिसूचनेनुसार नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील नव्याने स्थापन करण्यात आलेले मोहपा पोलीस स्टेशन आज दिनांक १३/०६/२०२६ रोजी पासून कार्यान्वित करण्यात आले आहे.


मोहपा व परिसरातील नागरिकांना अधिक प्रभावी, जलद व सुलभ पोलीस सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सदर पोलीस स्टेशन सुरू करण्यात आले आहे. नवीन पोलीस स्टेशन कार्यान्वित झाल्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे प्रतिबंधक उपाययोजना राबविणे तसेच नागरिकांच्या तक्रारींवर तत्पर कार्यवाही करणे अधिक परिणामकारक होणार आहे.यापूर्वी मा. श्री. हर्ष ए.पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी सदर ठिकाणी भेट देऊन आवश्यक सुविधा व व्यवस्थेची पाहणी केली होती. सर्व आवश्यक प्रशासकीय व भौतिक सुविधांची पूर्तता झाल्यानंतर आजपासून मोहपा पोलीस स्टेशनचे कामकाज अधिकृतपणे सुरू करण्यात आले आहे.

नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे तसेच कोणत्याही प्रकारच्या तक्रारी, माहिती अथवा मदतीसाठी मोहपा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने करण्यात आले आहे.

**१) पोलीस स्टेशन मोहपा चे कार्यक्षेत्र** :— मोहपा, तेलगाव, लोहगड, बुधला, पिलकापार, म्हसेपठार, खुर्सापार (रिठी), मोहगाव, सावंगी, वडोणा (बु.), वडोणा (खु.), कोतवालबर्डी, चाकडोह १,२,३, परडी देशमुख, खैरी देशमुख, सुसुंद्री, सावंद्री, वाठोडा, कोहळी, मोहळी, एल्कापार (रिठी), डोरली भिंगारे, राऊळगाव, एनविरा (रिठी), सावली (खु.), रामगिरी, दोरली खुर्द (रिठी), आमगाव (रिठ), सोनेगाव, लिंगा, पोही, लाडाई, खुमारी, देवबर्डी, मंडावी, नांदिखेडा, पिपळा किंखेडे, कन्याडोल, कोकरडा, सिंधी (रिठ), माडासावंगी, पारसोडी वकील,

तिष्ठी (खुर्द), तिष्ठी (बु.), तिडंगी, दाढेरा, झिल्पी, चारगाव, चनकापूर, माळेगाव, उबागी (रिठ).



# अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री विरोधात कळमेश्वर पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाची संयुक्त विशेष मोहीम
# गौंडखैरी पारधी बेडा येथे कारवाई करत ६ लाख २२ हजार ४५० रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १३/०६/२०२६ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या नेतृत्वात कळमेश्वर पोलीस, दंगा नियंत्रण पथक, नागपुर ग्रामीण आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथे संयुक्तपणे मोठी कारवाई करून रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

कळमेश्वर तालुक्यातील गोंडखैरी पारधीवेडा येथे अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेदरम्यान हातभट्टी दारू तयार करणाऱ्या ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. या कारवाईत कळमेश्वर पोलिसांनी ११४०० लिटर सडवा, १०० लिटर मोहाफुल दारू तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ४,३८,५००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी ६ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ०६ गुन्हे नोंदविण्यात आले आहे. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने १० गुन्हे नोंदवून २० लिटर गावठी दारू व ४७७० लिटर सडवा रसायन जप्त करून नष्ट केले. या कारवाईत १,८३,९५०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही विभागांच्या संयुक्त कारवाईत एकूण ६,२२,४५०/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त केला आहे.


PEPSI
DEF उपलब्ध है


Coolant





# मोटर सायकल चोरीचे २ गुन्हे, मोबाईल चोरीचा १ गुन्हा उघड, २ आरोपी अटक, १ लाख ८ हजार ९९९ रूपयांचा मुद्देमाल जप्त

# काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस स्टेशन काटोल येथे कमलेश हनुमानसिंग शेंगर,वय ४० वर्ष रा. रामदेवबाबा लेआउट काटोल रामदेवबाबा लेआउट काटोल,यांनी तक्रार दिली की, २८/०५/२६ चे ०९.०० वा. ते १०.३० वा. दरम्यान त्यांची फॅशन एक्स प्रो कंपनीची काळया रंगाची एम.एच.४० ए.जे ०९१८ मोटार सायकल कोणतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घरा समोरून चोरून नेली. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन काटोल येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला होता. तसेच दिनांक २६/०५/२६ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. दरम्यान रामदेवबाबा ले आऊट, काटोल येथे फिर्यादी ओमकार गणपतराव राऊत, वय ४० वर्ष, रा. रामदेवबाबा ले आऊट, काटोल यांच्या राहते घरून मोबाईल चोरी झाल्याने सदर प्रकरणी सुध्दा पोलीस स्टेशन काटोल येथे कलम ३०३(२) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला होता.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीसांनी सदर गुन्हयांचा सखोल तपास करून उकल केली आहे. गुप्तबातमीदारांच्या माहीतीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या अधारे काटोल पोलसांनी **१) गुजंन धनराज बोन्द्रे, वय १८ वर्ष रा. पिपळगाव राउत ता. नरखेड, जि नागपुर, ह.मु. रामदेवबाबा ले आउट काटोल यास दि १०/०६/२०२६ रोजी पिंपळगाव राउत ,ता नरखेड येथुन ताब्यात घेतले. नमुद आरोपीकडे** सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने त्याचा साथीदार **आरोपी क्र. २) सुजल राजेन्द्र खवसे, वय १९ वर्ष, रा. हिवरमठ ता. नरखेड, जि नागपुर ह.मु. पार्वती मंगल कार्यालय मागे काटोल यासोबत मिळुन** काटोल पोस्टे येथे दाखल मोटर सायकल चोरीचा आणि मोबाईल चोरीचा गुन्हा केल्याबाबत कबुली दिली तसेच त्यांनी मिळुन नागपुर शहर पोलीस स्टेशन एमआयडीसी हद्दीतुन सुध्दा मोटर सायकल चोरी केल्याचे सांगितले. **आरोपी क्र. २) सुजल राजेन्द्र खवसे, वय १९ वर्ष, रा. हिवरमठ ता. नरखेड, जि नागपुर ह.मु. पार्वती मंगल कार्यालय मागे , काटोल दि ११/०६/२०२६ रोजी काटोल येथुन ताब्यात घेवुन**

**अटक केले.** पोलीसांनी नमुद आरोपीतांकडुन चोरीस गेलली पोलीस स्टेशन काटोल येथे दाखल गुन्हयातील फॅशन एक्स प्रो कंपनीची काळया  रंगाची एम.एच.४० ए.जे ०९१८ किमंती २०,०००/रुपये  आणि मोबाईल ॲन्ड्रॉईड मोबाईल फोन किमंती १८,९९९/रुपये तसेच  नागपुर शहर पोलीस स्टेशन एमआयडीसी येथे दाखल गुन्हयातील मोपेड अँक्टीव्हा गाडी क्र. एम एच ३२ ए जी  ७३४३ किमंती ७०,०००/रुपये असा एकुण १,०८,९९९ /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**उघड झालेले गुन्हे**

**१) पोस्टे काटोल अपराध क्रमांक ५८०/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.स**

**२) पोस्टे काटोल अपराध क्रमांक ५८२/२६ कलम  ३०५ (अ) भा.न्या.स**

**२) पोस्टे एमआयडीसी ,नागपुर शहर, अप क्रमांक ११०१/२५ कलम ३०३ (२) भा.न्या.स**



# इलेक्ट्रीक वायर चोरीचा गुन्हा उघड, १ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उघड न झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असतांना दिनांक १२/०६/२०२६ रोजी चोरीचे गुन्हे करणारा सराईत आरोपी **आकाश उर्फ गोलु दिलीप रेवडीया** हा नरसाळा अंबीका, नगर नागपूर येथे असल्याचा बाबत गोपनिय माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी तात्काळ सदर ठिकाणी जावुन आरोपीचा शोध घेतला असता आरोपी मिळुन आला. आरोपी **आकाश उर्फ गोलु दिलीप रेवडीया, वय ३३ वर्ष, रा. नरसाळा अंबीका नगर नागपूर** याला ताब्यात घेत सखोल चौकशी केली असता त्याने त्याच्या साथीदार नामे सुरज उर्फ एलीयन भावसार, रा. कंजनपुर नागदेव मंदीर जवळ बैतुल, ह. मु. मुलताई याचे सोबत मिळुन पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत महालक्ष्मी नगर, सावनेर येथील घरातुन इलेक्ट्रीक वायर चोरीचा गुन्हा **केल्याचे कबुल केले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष इलेक्ट्रीक वायरचे ५ बंडल किंमती २५,०००/— रूपये असा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**उघड गुन्हा**

**पो.स्टे. सावनेर अप.क. ५७४/ २६ कलम ३०३,(२) भान्यासं**



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ३० लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त
# भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक १२/०६/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा महसुल नाका भिवापुर येथे नाकाबंदी केली असता संशयित टिप्पर (ट्रक) क्र. एम एच ३० बी डब्ल्यु ५५५६ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक सलीम खान हनीफ खान, वय ४१ वर्ष, रा. पुळपुळीत क्वाटर्स अब्दुल कलाम आकोट फाईल, अकोला जि. अकोला हा मिळुन आला. आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक संजय हरीविलास पालीवाल, रा. भवानी नगर, मुर्तीजापुर जि. अकोला याचे सांगणेवरून अवैध रेतीची वाहतुक करीत असल्याची माहिती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष टिप्पर (ट्रक) क्र. एम एच ३० बी डब्ल्यु ५५५६ किंमती ३०,००,०००/— रूपये आणि ८.७१ ब्रास रेती किंमती ४४,०००/— रूपये असा एकुण किंमती ३०,४४,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम ३०३ (२), ४९ भा.न्या.सं २०२३, ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता , ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**


SHRITEJ
EXPRESS
TATA

# पोलीस ठाणे पाचगाव हद्दीत विशेष मोहीम राबवून मौजा चांपा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्यांवर ०६ गुन्हे नोंद,
# ०८ लाख ०१ हजार ७५० रूपयांचा मुद्देमाल जप्त
# पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक १३/०६/२०२६ रोजी पाचगाव पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा चांपा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणारे व विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि प्रभारी श्रीमती भाग्यश्री धीरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी नागपूर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पाचगाव पोलीसांनी, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांच्यासह मौजा चांपा येथे **आरोपी १) श्रीचंद लालचंद पवार, वय ४० वर्ष, रा. चांपा, ता. उमरेड, जि. नागपूर २) सिकंदर लालचंद पवार, वय ४५ वर्ष, रा. चांपा, ता. उमरेड, जि. नागपूर ३) आयुष प्रदीप पवार, वय १८ वर्ष, रा. चांपा, ता. उमरेड, जि. नागपूर ४) राहुल उर्फ धर्मेंद्र वरतास पवार, वय ३८ वर्ष, रा. चांपा, ता. उमरेड, जि. नागपूर आरोपी व ०२ महिला आरोपी यांचेवर कारवाई करत नमुद ६ आरोपींवर ६ गुन्हे नोंद करण्यात आले.** पोलीसांनी घटनास्थळावरून  मोहाफुल गावठी दारू, लिटर मोहाफुल रसायन सडवा **तसेंच लोखंडी ड्रम इतर साहित्य** जप्त करून रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ३९५ लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच १२००० लिटर मोहाफुल रसायन सडवा,** ४२०० लिटर उकळलेले मोहाफुल रसायन सडवा **तसेंच लोखंडी ड्रम इतर साहित्य असा एकुण ८०१७५०/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपीतांविरुद्ध पाचगाव पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ०६ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

















# पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीत विशेष मोहीम राबवून मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद, ०१ लाख ०५ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

# कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक १२/०६/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथे मोहाफुल गावठी दारू गाळणारे व विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. सागर खर्डे उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात कळमेश्वर पोलीसांनी मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथे **०२ महिला आरोपी यांचेवर कारवाई करत नमुद आरोपींवर २ गुन्हे नोंद करण्यात आले.** पोलीसांनी घटनास्थळावरून एकुण २२५ लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच २२०० लिटर मोहाफुल रसायन सडवा **तसेंच प्लॅस्टीक ड्रम** असा एकुण १०५७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण २२५ लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच २२०० लिटर मोहाफुल रसायन सडवा असा एकुण १०५७००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद महिला आरोपीतांविरुद्ध कळमेश्वर पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ०२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

दिनांक १२/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, इतर साहित्य असा एकुण १०८४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०२ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी १) रोशन बुधराम चंदनबटवे, वय ४४ वर्ष, रा. नेहरू वार्ड मेंढा भंडारा, जि. भंडारा २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २५२ मोहाफुल दारू, २२०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, साहित्य असा एकुण १,०८,४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७९७ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १३/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७९७ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे  २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३४ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १५० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६३ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे  ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २०  आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण  १२८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ६२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ४२ आरोपी अशा एकुण १८७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ७९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने